Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन : एक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी, एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा.
**Email**: amitshingane156@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171240
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 192-196
December 2025

**Submitted:** 19 Nov. 2025
**Revised:** 29 Nov. 2025
**Accepted:** 14 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***सारांश***

*छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन हे केवळ ऐतिहासिक विजयापुरते मर्यादित नसून, ते 'सुशासनाचा' एक उत्कृष्ट जागतिक नमुना आहे. शौर्याला चातुर्याची आणि नियोजनाची जोड देत त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शून्यातून स्वराज्य निर्माण केले. त्यांच्या या यशाचे गमक त्यांच्या शिस्तबद्ध प्रशासकीय चौकटीत आहे.राज्यकारभारातील पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी त्यांनी 'अष्टप्रधान मंडळा'ची स्थापना केली. यामध्ये वंशावळीऐवजी गुणवत्तेवर आधारित मंत्र्यांची निवड करून कामाची स्पष्ट विभागणी केली. त्यांची गुप्तचर यंत्रणा अत्यंत प्रभावी होती, जी शत्रूच्या हालचालींची अचूक माहिती पुरवत असे. याच माहितीच्या आधारे त्यांनी 'गनिमी कावा' हे युद्धतंत्र आणि किल्ल्यांचे अभेद्य जाळे निर्माण केले. तसेच, दूरदृष्टीने उभारलेले स्वतंत्र आरमार भारताच्या सागरी संरक्षणाचा पाया ठरले.महसूल व्यवस्थेत त्यांनी मध्यस्थांना हटवून थेट रयतेशी संबंध जोडणारी 'रयतवारी पद्धत' रूजवली. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत, जमिनीची योग्य मोजणी, दुष्काळात करमाफी आणि पिकांच्या नुकसानभरपाईची तरतूद केली. त्यांचे प्रशासन पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आणि लोकाभिमुख होते; जिथे परधर्माचा आदर आणि स्त्रियांची सुरक्षा यांना सर्वोच्च स्थान होते. परकीय सत्तांशी सामना करताना त्यांनी केवळ युद्ध न करता 'मुत्सद्देगिरीचा' वापर करून स्वराज्याचे सार्वभौमत्व टिकवले. थोडक्यात, अचूक नियोजन, कठोर शिस्त आणि अंतिम जनकल्याण हेच त्यांच्या राजकीय व्यवस्थापनाचे सार आहे.*

***बिजशब्द :*** *शिवाजी महाराज, स्वराज्य, प्रशासन, राजकारण, सुशासन, धोरण, मंत्रीमंडळ, स्वराज्य स्थापनेचे धोरण.*

## प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एक महान, कुशल आणि दूरदृष्टी असलेले शासक होते. स्वराज्य स्थापनेसाठी त्यांनी केवळ शौर्य आणि धाडसच केले नाही तर चातुर्य आणि सूक्ष्म राजकीय व्यवस्थापनाचा अवलंब केला. तत्कालीन काळातील अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा घेवून त्यांनी एक संगठित, कार्यक्षम आणि लोकाभिमुख राज्यव्यवस्था निर्माण केली. तत्कालीन मुघल, आदिलशाही व निजामशाहीसारख्या बलाढ्य सत्तांशी सामना करताना त्यांनी आपल्या राजकीय नीतीमत्तेचा आणि धोरणात्मक कुशलतेचा उपयोग केला. त्यांच्या राज्यकारभारात धोरण, गुप्तचर यंत्रणा, मंत्रीमंडळ, प्रांतिक प्रशासन, महसूल व्यवस्था, लष्करी संघटना अशा विविध घटकांची चपखल मांडणी आढळते. शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन आजही सुशासनाचा आदर्श मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन केवळ ऐतिहासिक अभ्यासापुरते मर्यादित नाही, तर आजच्या आधुनिक शासन व्यवस्थेसाठीही मार्गदर्शक ठरताना दिसून येते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अमितकुमार गणेश शिंगणे, संशोधक विद्यार्थी, एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा.*

**How to cite this article:**
*शिंगणे, . अमितकुमार . गणेश . (2025). छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन : एक अध्ययन. Journal of Research & Development, 17(12(A)), 192–196.* https://doi.org/10.5281/zenodo.18308835

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18308835

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

त्यांच्या धोरणांमध्ये तत्त्वनिष्ठता, शिस्तबद्धता आणि जनकल्याणाचा आग्रह होता. आज जेव्हा सुशासन, पारदर्शकता, लोकसहभाग यावर भर दिला जातो, तेव्हा शिवाजी महाराजांच्या राजकीय व्यवस्थापनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे सदर शोधनिबंधात छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन अभ्यासले आहे.

**उद्दिष्टे**

1. शिवाजी महाराजांच्या राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करणे.
2. शिवाजी महाराजांच्या धोरणात्मक निर्णयांचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात मागोवा घेणे.
3. शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेतील विविध घटकांची कार्यपद्धती समजून घेणे.
4. आधुनिक राज्यकारभाराशी शिवाजी महाराजांच्या धोरणांची तुलना करणे.
5. सुशासनाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे योगदान अधोरेखित करणे.

**गृहितके**

1. शिवाजी महाराजांची राजकीय व्यवस्था ही तत्त्वनिष्ठ, कार्यक्षम व लोकाभिमुख होती.
2. शिवाजी महाराजांनी स्वराज्य राजनैतिक दृष्टिकोनातून समन्वयाने आणि योजनाबद्ध पद्धतीने चालवले.
3. शिवाजी महाराजांची गुप्तचर व्यवस्था आणि मंत्रिमंडळ कार्यक्षमतेचा सर्वोत्तम नमुना होती.
4. शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर आधारित प्रशासन चालवले.
5. शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन आजच्या सुशासनाच्या कल्पनांना प्रेरणा देणारे आहे.

**विषय विवेचन**

**1. स्वराज्य स्थापनेची राजकीय पार्श्वभूमी**

शिवाजी महाराजांनी जेव्हा स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला, तेव्हा दख्खनमधील राजकीय परिस्थिती अतिशय अस्थिर होती. 16व्या आणि 17व्या शतकाच्या सुमारास भारतात मुघल साम्राज्य, आदिलशाही (बीजापूर) आणि निजामशाही (अहमदनगर) या तीन प्रमुख सत्तांचा प्रभाव होता. मराठ्यांकडे कोणतेही स्वतंत्र राज्य नव्हते. याच पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी "स्वराज्य" स्थापनेचा संकल्प केला. मराठा प्रदेशात स्वराज्य उभारणे हे अत्यंत कठीण कार्य होते. मात्र, शिवाजी महाराजांनी तात्कालीन परिस्थितीचा अभ्यास करून राजकीय संधी निर्माण करून स्वराज्य उभारले.सह्याद्रीच्या डोंगररांगा, दुर्गम किल्ले आणि जंगलांचा लाभ घेऊन त्यांनी गनिमी कावा आणि छापामार युद्धतंत्र विकसित केले. त्यामुळे एक लहान पण प्रभावी सत्ता निर्माण करण्यास मदत झाली.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केवळ तलवारीच्या जोरावर केली नाही, तर त्यांनी तत्कालीन काळातील अस्थिर राजकीय स्थितीचे अचूक आकलन करून, मुत्सद्देगिरी, कौशल्य आणि जनसमर्थन यांच्या आधारे एक सशक्त राजकीय व्यवस्था निर्माण केली. यामुळेच त्यांची स्वराज्य स्थापना ही भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी घटना मानली जाते.

**2. अष्टप्रधान मंडळाची रचना**

शिवाजी महाराजांनी स्वराज्य कारभाराच्या कार्यक्षमतेसाठी "अष्टप्रधान मंडळ" स्थापन केले. यामध्ये राज्याच्या प्रशासनासाठी आठ प्रमुख मंत्र्यांची एक समिती स्थापन केली. ज्यामध्ये पेशवा (प्रधान मंत्री), अमात्य (महसूल मंत्री), मंत्री (घरगुती व्यवहार), सुमंत (परराष्ट्र मंत्री), सचिव (पत्र व्यवहार), सेनापती (लष्कर प्रमुख), नायक (धार्मिक विभाग), न्यायाधीश (न्याय व्यवस्था) होते. प्रत्येक मंत्री विशिष्ट कार्यासाठीच नेमलेला असे, त्यामुळे कार्यविभागणी स्पष्ट होती. मंत्र्यांची निवड ही त्यांची निष्ठा, कौशल्य व चारित्र्याच्या आधारे होत असे. हे मंत्री केवळ सल्लागार नव्हते, तर जबाबदारीने निर्णय घेणारे होते. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून शिवाजी महाराजांनी संस्थात्मक प्रशासन उभे केले. राजकारण, धर्म, अर्थकारण, लष्कर व परराष्ट्र धोरण इत्यादी सर्वच क्षेत्रांना या मंडळामुळे समतोल व नियोजनबद्ध दिशा मिळाली.हे मंत्री विशिष्ट कार्यक्षेत्रांमध्ये विशेषज्ञान असलेले व स्वराज्य आणि शिवाजी महाराजांप्रती निष्ठावान होते. अष्टप्रधान मंडळ हे राज्याच्या निर्णय प्रक्रियेस मदत करणारे सल्लागार मंडळ होते, मात्र अंतिम निर्णयाचा अधिकार छत्रपतींनाच असायचा. हे अष्टप्रधान मंडळ शिवाजी महाराजांच्या सुशासन दृष्टिकोनाची साक्ष आहे. ही व्यवस्था आजच्या काळात “मंत्रीमंडळ” चे पूर्वरूप मानली जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

### 3. गुप्तचर व्यवस्था

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी आणि त्याच्या रक्षणासाठी केवळ तलवार नव्हे, तर बुद्धिमत्तेचेही शस्त्रे प्रभावीपणे वापरले. त्यांची गुप्तचर व्यवस्था ही त्याच्या प्रशासनातील एक अत्यंत प्रभावी आणि महत्त्वपूर्ण अंग होती. स्वराज्याच्या गुप्तचर यंत्रणेसाठी विशेष प्रशिक्षित व निष्ठावान व्यक्तींची निवड केली होती. हे गुप्तचर वेगवेगळ्या प्रदेशात व्यापारी, साधू-संत, प्रवासी, वारकरी, घोडेस्वार अशा विविध रूपांत फिरत असत. मुघल, आदिलशाही, पोर्तुगीज यांसारख्या परकीय सत्तांबद्दलच्या लष्करी हालचाली, राजकारण, अंतर्गत संघर्ष, किल्ल्यांची व्यवस्था आदी सर्व माहिती शिवाजी महाराज वेळोवेळी मिळवायचे. शहर आणि गावांमध्ये स्थानिक गुप्तचर ठेवले जात. हे गुप्तचर जनतेची मानसिकता, आर्थिक स्थिती, दारूगृह, बाजारपेठ यांचा आढावा घेऊन अहवाल पाठवत. गुप्त संदेश पोहोचवण्यासाठी विशेष प्रशिक्षित धावक, गुप्त चिन्हे, आणि दूतो (दूत) वापरले जात. त्यामुळे कोणतीही योजना शत्रूपर्यंत पोहोचत नसे. शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यांवरही गुप्तचर नेमले होते. हे गुप्तचर किल्लेदार, सरदार, व सैनिकांच्या निष्ठेवर लक्ष ठेवत आणि गरज पडल्यास तत्काळ अहवाल देत. या गुप्तचर यंत्रणेच्या साहाय्याने अनेक वेळा शत्रूंचे कट, विश्वासघात, बंडखोरीचे प्रयत्न वेळेपूर्वीच उधळून लावले. जसे - अफजलखानाच्या मोहिमेच्या वेळी शिवाजी महाराजांना त्याच्या गुप्त हेतूंविषयी अगोदरच माहिती मिळाली होती. शाहिस्तेखानाचे मोहिमे दरम्यान त्याच्या छावणीविषयीची अंतर्गत माहिती मिळवून पुण्यातील लाल महालावर धाडसी हल्ला केला. सुरतेच्या लुटीवेळी सुरतच्या शहरी व्यवस्थेची माहिती आधीच मिळवली गेली होती, त्यामुळे लुटीची योजना यशस्वी झाली.

### 4. प्रशासनिक विभागणी आणि महसूल व्यवस्था

शिवाजी महाराजांनी एक सुदृढ, न्यायाधारित आणि शिस्तबद्ध प्रशासन उभारले होते. त्यांच्या प्रशासनिक विभागणी व महसूल व्यवस्थेने स्वराज्याला एक संगठित रूप दिले. त्यांनी फारसी, तुर्की व आदिलशाही पद्धतीचा अभ्यास करून त्यात स्थानिक गरजांनुसार सुधारणा केल्या. स्वराज्याचे सुयोग्य प्रशासन करण्यासाठी प्रांत, परगणे आणि गावांची विभागणी विभाग (प्रांत), परगणे आणि गाव अशा स्तरांमध्ये केली. शिवाजी महाराजांनी मलिक अंबर याच्या रयतवारी पद्धतीवर आधारित महसूल व्यवस्था आणखी कार्यक्षम केली. त्यांनी जमिनीचे अचूक मोजमाप करण्यासाठी हुंडा, गज, काठी इत्यादी मोजमाप साधने वापरली. यामुळे कर निश्चित करताना अचूकता येत असे. जमिनीचा कर हा जमिनीच्या दर्जावर व पिकाच्या उत्पन्नावर आधारलेला असे. सरासरी 33% (तृतीयांश) इतका कर आकारण्यात येत असे, जो त्या काळात अत्यंत न्याय्य मानला जात होता. धान्याऐवजी रोख रकमेने कर वसूल करण्यावर भर दिला. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य आले. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास करमाफी दिली जात असे. बळजबरीने कर वसूल करण्यास बंदी होती. महसूल अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर अन्याय केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जात असे. एकंदरीत ही व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताची, न्याय्य आणि शोषणविरहित होती. महसूलातून जमा झालेला पैसा राजकोषात ठेवला जात असे आणि त्याचा वापर लष्कर, सार्वजनिक कामे, किल्ले रक्षण, धर्मकार्य आणि न्यायव्यवस्था यासाठी होत असे.

### 5. धर्मनिरपेक्षता आणि लोकाभिमुखता

शिवाजी महाराजांनी स्वराज्यात कुठल्याही एका धर्माला विशेष स्थान न देता सर्व धर्मांचा सन्मान केला. हिंदूंप्रमाणेच मुस्लिम, ख्रिस्ती, जैन, सिख इत्यादी धर्मीयांच्या धार्मिक स्वातंत्र्याला मान-सन्मान दिला. त्यांनी कधीही धर्मावर आधारित भेदभाव केला नाही. युद्धादरम्यान कोणतीही मशिद, दरगाह किंवा इतर धार्मिक स्थळांची नासधूस न करण्याची स्पष्ट आज्ञा दिली होती. त्यांच्या दरबारात मौलाना हैदर अली, दौलत खान, मदारी मेहतर, शेख महमूद यांसारख्या मुस्लिम व्यक्तींची महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती केली होती. पोर्तगिज व इंग्रज यांच्याशी व्यवहार करताना त्यांच्या धर्मावर टीका न करता केवळ राजकीय धोरणांचा विचार केला.शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्षतेसोबतच लोकाभिमुखतेचे धोरण होते. त्यांनी शेतकऱ्याला राज्याचा कणा मानला. त्यांच्यावर कोणताही अतिरिक्त कर लावला जात नसे. स्थानिक पातळीवर न्यायदानासाठी स्थानीय अधिकारी, पंचायती व न्यायमूर्ती नेमले जात. राजा म्हणून स्वतःही काही गंभीर प्रकरणांमध्ये न्याय देत असत. युद्धकाळात पकडलेल्या महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. स्त्रियांची प्रतिष्ठा अबाधित ठेवणे हा शिवकालीन राज्यधर्म होता. कर रचना, सार्वजनिक कामे, व लष्करी हालचाली याबाबत स्थानिक समाजाचा सल्ला घेतला जात असे. पाणीपुरवठा, धरणे, रस्ते, मंदिरे, धर्मशाळा यांसारखी सार्वजनिक कामे सुरू करण्यात आली. त्यांच्या या दृष्टीकोनामुळेच स्वराज्य ही संकल्पना केवळ राजकीय स्वातंत्र्यपुरती मर्यादित राहिली नाही, तर ती जनतेच्या कल्याणाशी जोडलेली होती.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

### 6. लष्करी धोरण

शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण हे त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीचे आणि रणनीतीचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. त्यांनी फारसी, आदिलशाही व मुघल लष्करी पद्धतीचा सखोल अभ्यास करून स्वतःची स्वतंत्र लष्करी प्रणाली उभारली. हे धोरण चपळता, गनिमी कावा, स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा वापर आणि जनतेच्या पाठिंब्यावर आधारित होते. त्यांनी डोंगरी किल्ल्यांवर आधारित संरक्षण व्यवस्था निर्माण केली. राजगड, तोरणा, रायगड, सिंधुदुर्ग, प्रतापगड यांसारखे किल्ले बांधून रक्षण व नियंत्रणाचे केंद्र तयार केले. किल्ल्यांची निवड रणनीतीनुसार भौगोलिकदृष्ट्या बलाढ्य ठिकाणी केली. प्रत्येक किल्ल्यावर किल्लेदार, तोफखाना, शस्त्रागार व शिस्तबद्ध लष्कर ठेवले होते.शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या बळकटीकरणासाठी आणि पोर्तुगीज व सिद्दी यांच्या सागरी धोक्यांना सामोरे जाण्यासाठी नौदलाची स्थापना केली. ज्यामुळे त्यांना भारतीय इतिहासातील पहिले आधुनिक नौदल उभारणारे राजे म्हणतात. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग यांसारख्या जलदुर्गांची निर्मिती केली. शिस्तबद्ध लष्कर निर्मिती केली, अर्थात कायमस्वरूपी पगारावर लष्कराची नियुक्ती केली. लष्करात घोडदळ, पायदळ, तोफखाना यांचा समावेश होता. सैनिकांना लोकांचे धन व स्त्रियांचा अपमान न करण्याचे आदेश दिले होते. युद्धात मिळालेले लूटही नियमितपणे विभागली जात असे. बंडखोर वा भ्रष्ट अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा केली जाई. लष्करी धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे गुप्तचर यंत्रणा. शत्रूच्या हालचाली, किल्ल्यांची माहिती, अंतर्गत कलह याची गुप्त माहिती मिळवली जाई. यामुळे योजना आखताना अचूक निर्णय घेता येत. शत्रूपेक्षा संख्येने कमी असूनही विजय मिळवण्याचे कसब त्यांच्या धोरणात होते.

### 7. विदेशी धोरण आणि मुत्सद्देगिरी

शिवाजी महाराज हे केवळ लढवय्ये राजे नव्हते, तर एक अत्यंत बुद्धिमान, दूरदृष्टी असलेले मुत्सद्दी होते. त्यांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी आणि विस्तारासाठी परकीय सत्तांबरोबर अत्यंत चतुराईने व्यवहार केला. हे धोरण त्यांनी राजकीय संतुलन, कूटनीती, व्यवहारज्ञान आणि स्वाभिमान या मूल्यांवर आधारित ठेवले. सुरुवातीला शिवाजी महाराज आदिलशाहीच्या सेवेत होते. पुढे त्यांनी स्वराज्यासाठी आदिलशाहीविरोधात बंड केले. तरीसुद्धा त्यांनी नेहमी प्रत्येक सत्तेशी राजनैतिक संधी आणि फूट यांचा फायदा घेण्याची नीती अवलंबली. आदिलशाहीतील अंतर्गत संघर्षांचा फायदा घेऊन अनेक किल्ले आपल्या ताब्यात घेतले. औरंगजेबासारख्या बलाढ्य मुघल सम्राटाशी थेट सामना करण्याऐवजी गनिमी कावा, तर कधी तहाचा मार्ग स्वीकारला. सन 1665 चा पुरंदर तह ही मुत्सद्देगिरीची एक योजना होती. या तहामुळे त्यांना काही किल्ले गमावले तरीही राजकीय अस्तित्व वाचवले आणि पुढील लढ्याची तयारी केली. औरंगजेबाच्या दरबारात अपमान होऊनही त्यांनी साहसाने सुटका करून घेतली. शिवाजी महाराजांनी परकीय सत्तेशी देखील मुत्सद्देगिरीने सामना केला. इंग्रजांशी राजनैतिक संबंध ठेवले, परंतु त्यांची धूर्तता ओळखून सावध धोरण स्वीकारले. त्यांनी सूरतवर दोन वेळा (1664, 1670) हल्ला करून इंग्रजांच्या वसाहतींवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीजांशी सामरिक आणि व्यापारी संबंध राखले. त्यांच्या सागरी वर्चस्वाला रोखण्यासाठी आपले नौदल बळकट केले. मात्र धर्माच्या आधारे पोर्तुगीजांशी शत्रुत्व निर्माण न करता राजकीय धोरणावर भर दिला. डचांशी मर्यादित संपर्क होता, पण त्यांचा व्यापार आणि सागरी महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्याशी वैर न धरता व्यवहारिक संबंध ठेवले. शिवाजी महाराजांनी राजदूत, शिष्टमंडळे, तह, करार आणि गुप्त बातमीदार यांचा योग्य वापर केला. जसे, राजा जयसिंगाबरोबर पुरंदर तहाच्या वेळी राजदूत पाठवले गेले. राजकारणात संधी साधणे, शत्रूला फसविणे आणि आपल्या बाजूने खेचणे यामध्ये ते पटाईत होते. आपल्या मुला-नातवंडांना राजकारणात योग्य प्रकारे बसवणे, कुटुंबीयांमधील सत्ता संघर्ष हाताळणे ही देखील मुत्सद्देगिरी होती. संभाजी महाराजांना उत्तम शिकृषण देऊन ते पुढे स्वराज्याचा कारभार सांभाळतील याची तयारी त्यांनी आधीपासूनच केली होती.

### निष्कर्ष

1. शिवाजी महाराजांचे राजकीय व्यवस्थापन हे दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, नियोजनबद्धता आणि लोककल्याण यांचा उत्कृष्ट नमुना आहे. त्यांनी स्थापन केलेली राजसत्ता ही न्यायाधिष्ठित, धर्मनिरपेक्ष आणि कार्यक्षम होती. त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याने स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. आजही त्यांच्या धोरणांचा अभ्यास हा भारतातील प्रशासनिक धोरणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.
2. शिवाजी महाराजांची गुप्तचर व्यवस्था ही त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीची आणि प्रशासकीय दूरदृष्टीची साक्ष होती. ह्या यंत्रणेने त्यांच्या लष्करी मोहिमांना भक्कम पाठबळ दिले आणि त्यांना शत्रूंवर निर्णायक विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

3. शिवाजी महाराजांची प्रशासनिक विभागणी ही शिस्तबद्ध, स्थानिक गरजांनुसार सुचवलेली आणि कार्यक्षम होती. महसूल व्यवस्था ही शेतकरी-केंद्रित, पारदर्शक व नैतिकतेवर आधारित होती. या पद्धतींमुळे शिवाजी महाराजांचे राज्य लोकाभिमुख व स्वयंपूर्ण बनले.
4. शिवाजी महाराजांचे विदेशी धोरण हे न्याय्य, स्वाभिमानी, लवचिक आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणारे होते. मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून त्यांनी बलाढ्य साम्राज्यांना पुरून उरले आणि स्वतःचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्रस्थापित केले. आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातही त्यांचे धोरण प्रेरणादायी व अभ्यासासारखे ठरते.
5. शिवाजी महाराजांची धर्मनिरपेक्षता ही केवळ सहिष्णुतेपुरती मर्यादित नव्हती, तर ती राजकारणाचा एक मूलभूत आधार होती.
6. त्यांची लोकाभिमुखता ही प्रशासनाच्या प्रत्येक पातळीवर परावर्तित होत होती. आजच्या आधुनिक लोकशाहीतही शिवाजी महाराजांचा आदर्श सर्वसमावेशक आणि जनतेसाठी झटणाऱ्या राज्यकर्त्याचा आहे.
7. शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण हे केवळ सामरिक विजयापुरते मर्यादित नव्हते, तर ते स्वराज्य स्थापनेसाठी आधारस्तंभ ठरले. त्यांनी भारताच्या इतिहासात युद्धकलेचा नवा आदर्श निर्माण केला, ज्याचा प्रभाव पुढील अनेक वर्षांपर्यंत टिकून राहिला.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. Itan, Richard - The Rise of Islam and the Bengal Frontier, University of California Press, 1993.
2. Sarkar, Jadunath - Shivaji and His Times, Longmans Green & Co., London, 1920.
3. आचार्य, धनंजय - मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007.
4. गॉर्डन, डॉ. स्टुअर्ट (अनु. - कुलकर्णी र. अ.,) - द मराठाज (1600-1818), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2016.
5. पवार, जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, 2010.
6. वैद्य, मिनाक्षी - गुप्तहेर बहिर्जी नाईक, वरदा प्रकाशन, पुणे, 2021.
7. शहा, डॉ. जी. बी.; वाघ, डॉ. डी.एन.; चौधरी डॉ. एच. आर., - मराठ्यांचा इतिहास (1600-1750), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2019.